
# भित्रे भूत



रत्नाकर मतकरी

# भित्रे भूत

रत्नाकर मतकरी

प्रकाशन विभाग
माहिती आणि प्रसारण मंत्रालय
भारत सरकार

March 1992 Phalgun 1913

© प्रकाशन विभाग

मूल्य : रु. १८.००

प्रकाशक, प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार,
पटियाला हाऊस, नवी दिल्ली-१
मुखपृष्ठ - रेखाटने - हर्षा शाह, स्वाती जोशी.

प्रकाशन विभाग ● विक्री केन्द्र

- सुपर बझार, कॅनॉट सर्कस, नवी दिल्ली-११० ००१.
- कॉमर्स हाऊस, करीमभॉय रोड, बेलार्ड पिअर, मुंबई-४०० ०३८.
- ८, एस्प्लनेड ईस्ट, कलकत्ता-७०० ००१.
- एल. एल. ए. ऑडिटोरियम, ७३६, अण्णामलाई, मद्रास-६०० ००२.
- बिहार स्टेट को ऑपरेटिव्ह बँक बिल्डिंग, अलोक राजपथ, पटणा-८०० ००४.
- प्रेस रोड, त्रिवेंद्रम-६९५ ००१.
- १०-बी, स्टेशन रोड, लखनौ-२२६ ००४.
- स्टेट अर्चालॉजिकल म्युझिअम बिल्डिंग, पब्लिक गार्डन, हैदराबाद-५०० ००४.

मुद्रक : मॉडर्न आर्टस अँड इंडस्ट्रिज, १५१ ए ट्रेड इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई-४०० ०१३.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| भित्रे भूत | १ |
| मेले तरी वाचतील ! | ८ |
| टापटीप आजी | २१ |

# प्रकाशकीय

बालकुमारांच्या हाती ख्यातनाम लेखक श्री. रत्नाकर मतकरी यांच्या कथांचा खजिना देताना आम्हाला आनंद होत आहे. श्री. मतकरी यांची तुमच्याशी मासिकांतून केव्हाच गट्टी जमली आहे. त्यांचा मी अधिक परिचय तो काय देणार.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याच्या प्रकाशन विभागातर्फे मुलांसाठी विविध भाषांमधे काही पुस्तकं प्रसिद्ध करण्याचं ठरविण्यात आलं. फारच कमी दिवसांत हे काम पूर्ण करायचं होतं. मराठी पुस्तकांच्या संपादनाची जबाबदारी आमच्या योजनेचे संपादक श्री नीतीन केळकर यांच्यावर सोपवली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हे पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवणं शक्य झालं. त्यांचेही आभार.

*डॉ. श्यामसिंह शशि*
संचालक

# भित्रे भूत

मुलांनो, आता मी तुम्हाला एक भुताची गोष्ट सांगणार आहे.

बापरेऽ हो घाबरलात ना? पण गोष्ट भुताची असली तरी भीतीची नाही. गमतीची आहे. बंडल! भुताची गोष्ट काय गमतीची असं वाटतं ना? मग ऐका तर.

गोष्टीचे नाव आहे: भित्रे भूत

ते घर चित्राने पाहताक्षणीच पसंत करून टाकले. बाहेर केवढे तरी अंगण शिवा-शिवी पकडा-पकडी खेळायला! आत लांबरुंद खण, त्यांची दारे तर काय मजेशीर–एका खणाला दोन-तीन! म्हणजे लपाछपी खेळायला काय मज्जा! कुठूनही येऊन 'भोऽज्ज्या' करता येईल, सापडायला म्हणून नको.

झालेच तर वरती एक छोटीशी माडी! आईने काम सांगितले की दडून बसायला! नाहीतर बाबा रागावले की त्यांच्यावर रुसून बसायला!

आणि होऽ आणखी एक जम्माडी जंमत; घरामध्ये एक अडगळीची खोली! चिक्कार जुने सामान पडलेले. पण सगळे निकामी. फाटलेले सूप, जात्याची एकच तळी, उसवलेली गोणती, चीर पडलेले मुसळ आणखी असेच काय काय! या वस्तू वापरून भातुकलीतले घर अगदी खऱ्या घरासारखे सजवता आले असते. शिवाय आणखी नव्या नव्या वस्तूही कुठून कुठून जमवून या कोठारात आणून टाकता आल्या असत्या. पण पंचाईत एकच होती. भातुकली खेळण्यासाठी मुली येणार कुठून? कारण घर तसं आडबाजूला होते. बाकीची घरे पार लांब होती. मध्ये झाडी होती.

पण चित्रा एवढ्या तेवढ्याने हटणारी मुलगी नव्हती. तिने विचार केला की, घरे लांब असली म्हणून काय झाले, त्यात मुली तर असतीलच! आणि मुली असल्या म्हणजे आपली त्यांची गट्टी होणारच! गट्टी झाली म्हणजे त्या एवढे लांबसुद्धा लपाछपी, छप्पापाणी, भातुकली खेळायला येणारच! तेव्हा खोटी होती, ती फक्त या घरात राहायला येण्याची आणि तिथेच तर सगळे बिनसले होते. कारण आई-बाबांना घर पसंत पडलेले नव्हते.

बाबांना एक वेळ हे घर चालले असते. कारण त्यांना शहरातल्या टीचभर जागेचा आला होता कंटाळा! बदली झाल्याबरोबर त्यांनी ठरवून टाकले होते की, आता जागा घ्यायची ती चांगली लांबरुंद, ऐसपैस! पण त्यांच्या मनासारखी जागा त्यांना गावात कुठेच मिळत नव्हती. शेवटी मंडळी तात्पुरती


HARSHA

एका चाळीत राहू लागली होती. कुठून तरी बाबांच्या कानावर आले की, जरा वस्तीपलीकडे एक जुने घर आहे. घर रिकामेच आहे. मालक ते स्वस्तात द्यायला तयार आहे. त्यांनी लगेच मालकाची गाठ घेतली. मालकाने ताबडतोब चावी दिली. म्हणाला, मी येणार नाही. तुम्ही घर पाहा. पसंत असेल तर उद्यापासून राहायला लागा. भाडे नंतर द्या पण आधी घराचा अनुभव घ्या. कारण त्या घरात कुणी एका रात्रीहून अधिक वेळ राहतच नाही. चित्राचे वडील लगेच संध्याकाळी घर बघायला आले. सोबत चित्रा आणि आई. वडिलांना घर ठीक वाटले. चित्रा तर नाचायलाच लागली. पण आई? उंहूं. ती सारखी 'नको बाई हे घर कसंतरीच वाटतं' असे करीत राहिली.

बाबा शेवटी चिडले. म्हणाले, 'कसंतरी काय? घरात धुरळा आहे. म्हणून असं दिसतंय्. साफ केलं की छान होईल.'

'तरी नकोच.' आई म्हणाली, 'शेजारच्या बाई सांगत होत्या, की इथं ते तसलं काहीतरी आहे.'

यातले शेवटचे शब्द चित्राला ऐकू जाणार नाही इतक्या हलक्या आवाजात जरी तिने उच्चारले तरी चित्राच्या तिखट कानांना ते ऐकू आलेच. त्यांचा अर्थही कळला. तसलं काहीतरी आहे म्हणजे घर भुताने झपाटलेले आहे! त्यावर बाबा म्हणाले, 'तुझं काहीतरीच. आपला नाही भुताबितांवर विश्वास!'

बाबांनी हे म्हणायला आणि कुणीतरी एकदम मोठ्याने गळा काढून रडायला एकच गाठ पडली. अगदी ओक्साबोक्सी, हुंदके देऊन कुणीतरी रडायला लागले आणि घरभर त्याचे रडणे घुमू लागले.

त्याबरोबर तिघेही घाईगर्दीने घराबाहेर पडली आणि घराला कुलूप लावून रस्त्यावर आली. बाबांचे पाय लटपटत होते आणि आई बेशुद्ध पडणार असे वाटत होते. चित्राला मात्र घरातून एवढ्या लवकर बाहेर पडल्याबद्दल फार वाईट वाटत राहिले. हे घर कसे वेगळेच आणि गंमतीदार वाटत होते! असल्या घरात आपण आजवर कधीच राहिलो नव्हतो आणि आता या घरात राहायला मिळण्याची शक्यता एकूण कमीच दिसत होती. भलत्या वेळी रडून आपला सगळा बेत उधळून टाकणाऱ्या त्या भुताचा तिला चांगलाच राग आला.

त्या रात्री गाढ झोप लागली, तरी तिच्या डोक्यातून त्या घराचे विचार जाईनात. त्यामुळे स्वप्ने पडत राहिली, तीही त्या घरात मुली जमवून खेळण्याचीच. शेवटी जेव्हा का सगळ्या मुली घाबरून किंचाळत पळाल्या आणि ती एकटीच राहिली, तेव्हा मात्र ती एकदम दचकून जागी झाली.

नवीन शाळेत अजून नाव घातलेले नसल्यामुळे चित्राला सध्या सुट्टीच होती. तेव्हा दुसऱ्या दिवशी बाबा ऑफिसात गेल्यागेल्या तिच्या मनात एक धाडसी कल्पना शिरली. बाबांनी 'त्या' घराची चावी एका खिळ्याला लावून ठेवलेली तिने पाहिली होती. ती तिने हळून फ्रॉकच्या खिशात चिंचेबरोबर ठेवून दिली. आतमध्ये कामात गुंतलेल्या आईला 'आई, मी जाऊन येते गऽ' असे बाबांच्या पद्धतीने ओरडून सांगितले आणि तिने 'कुठे'?' विचारायच्या आत ती सटकली देखील. वेळ दुपारची होती. सगळीकडे लख्ख ऊन पडले होते. त्यामुळे घर सापडायला चित्राला मुळीच त्रास पडला नाही. तिने चावी लावून

कुलूप उघडले आणि दोन्ही दारे लोटली. झपाटलेल्या घराला शोभेल असाच कर्रर आवाज करीत ती उघडली.

चित्राने आत पाऊल टाकले. एकेका खणातून ती पाहणी करीत फिरू लागली. कोपऱ्याकोपऱ्यातून कोळिष्टके लटकत होती. जमिनीवर बोटभर धूळ जमा झाली होती. छे छे, हे घर कुणीतरी एकदा नीट साफ करायलाच हवे! अगदी झाडून बादल्याच्या बादल्या पाणी ओतून, पावडर टाकून! ती माडीच्या जिन्यापर्यंत गेली आणि जे दिसले त्याने दचकली. माडीच्या जिन्यावरून कोणीतरी खाली येत होते. पायऱ्यांवर पाय न टेकवता, तरंगत, हलके, वाफेसारखे काहीतरी पारदर्शक खाली उतरत होते. त्याच्या डोळ्याच्या जागी जसे काही दोन निखारे पेटले होते. चित्रा मोठ्याने किंचाळून त्या भयंकर जागेपासून पळत सुटली... पळता पळता थकून ती एका झाडाच्या बुंध्यावर बसली. तिला भलतीच धाप लागली होती.

बसल्या बसल्या ती विचार करू लागली.

कोण होते ते? भूत? नक्कीच? या घराला झपाटणारे भूत! पण असेना, भूत असले तर आपल्या घरचे. आपल्याला त्याला घाबरण्याचे कारण काय? असेल ते पारदर्शक, म्हणून आपण त्याला घाबरायचे की काय? त्यातून आपल्याला आवडणारे घर बळकावून ते बसले आहे. त्याने भ्यावे हवे तर आपल्याला!

या विचाराने ती परत घराशी गेली.

तिच्या कानांवर हसण्याचा मंद आवाज आला. एखादे वयोवृद्ध दातपडके माणूस हसेल, तसा तो स्वर होता. तिने डोकावून पाहिले. भूत स्वतःशीच हसत होते. खदखदून, नसलेले पोट धरधरून हसत होते. बहुतकरून त्याने तिची जी त्रेधातिरपीट उडवली होती, त्यासाठी हसत होते.

चित्राला राग आला. ती जोरात ओरडली, 'चूऽऽप!' तशी काय चमत्कार! भूत भयंकर दचकले आणि भीतीने जागच्या जागीच कोसळले.

भूताची ती अवस्था पाहून चित्राला भलतीच गंमत वाटली. ती जोरजोराने हसत सुटली. ही ही ही हीऽ....

भूत कसेबसे लटपटत उभे राहिले, आणि तिला म्हणाले, 'तू घाबरवलस मला?'

भूत आपल्याला घाबरते, हे लक्षात येताच चित्रा अधिकच धीट झाली. 'हो तर मी तुला घाबरवलं आणि आता मी हे सगळ्यांना जाऊन सांगणारेय्.'

तशी भूत अधिकच घाबरले. गयावया करीत ते म्हणाले-

'दया कर माझ्यावर, आणि हे बाहेर कुण्णाकुण्णाकडे बोलू नकोस. जर का लोकांना कळलं की भूत माणसांना घाबरतं, तर मग आम्हा भुतांना कुठंच राहायला नको. लोक जिथं तिथं काठ्या घेऊन आमच्या मागे लागतील आणि आम्हाला सगळीकडून हुसकावून लावतील.'

'मी तुला हुसकावून लावणारेय्.' चित्रा निर्धाराने म्हणाली, ' आम्हाला या जागेत राहायचंय् नि

तू इथून गेल्याशिवाय आई इथं पाऊलसुद्धा ठेवणार नाही.'

'पण मी जाऊ कुठं? हे घर कसं शांत आहे. मला माणसांच्या गडबडीपासून दूर, शांत वातावरणात राहायला आवडतं.' 'अस्सं? शांत वातावरणात राहायला आवडतं का तुला?' असे ठसक्याने विचारून चित्रा त्या शांत वातावरणातल्या घरातून तरातरा चालायला लागली.

भूत तिच्या मागोमाग दारापर्यंत आले. ' पण कुणाला सांगणार नाहीस ना तू मला घाबरवल्याचं?' त्याने कळवळून विचारले.

'अहं,' चित्राने कबूल केले.

हवं तर मी त्याबद्दल तुला अधांतरी चालायचं शिकवेन.' भुताने लालूच दाखवली.

चित्राने क्षणभर विचार केला. सगळा वर्ग भरला असताना आपण मुद्दाम उशिरा शाळेत गेलो आहोत-आणि अधांतरी तरंगत तरंगत साऱ्या वर्गाच्या डोक्यावरून जागेवर जाऊन बसतोय. मुली ते दृश्य पाहून फटाफट जागच्या जागी बेशुद्ध पडताहेत, वर्गशिक्षिका मुख्याध्यापिकांकडे तक्रार करायला गेल्या आहेत. त्या दोघीही परत येतात आणि अधांतरी चालणाऱ्या चित्राला पाहून मुख्याध्यापिकाबाईचं हृदय जागच्या जागी बंद पडतं! नको ग बाई, !! फारच घोटाळा होईल आपण काहींतरी खुळचट गोष्टी शिकलो तर! 'मला काही शिकवूबिकवू नकोस.' चित्राने भुताला दम दिला. 'त्याऐवजी तू हे घर सोडून जा—'

'ते मला शक्यच नाही.' भूत गयावया करीत म्हणाले, 'पण तू नाही ना सांगणार कुणाला? प्लीज.'

'बरं बरं,' चित्राने त्याची दया आल्यासारखे दाखवले.

'कुणाला नाही सांगणार मी तुला घाबरवल्याचं.' नाही तरी तसे सांगितल्यावर विश्वास कोण ठेवणार होते. उलट सगळ्यांनी तिला खोटारडीच ठरवलं असतं.

पण संध्याकाळी बाबा ऑफिसमधून घरी आल्यानंतर मात्र चित्रा त्यांच्या कानात कुजबुजली— 'बाबा तुम्हाला एक जम्माडी जम्मत सांगायचीयू. आईला सांगायची नाही हं.' अर्थात चित्राने भूताला दिलेले वचन काही मोडले नाही.स्वत:ची हुशारी सांगण्याचा मोह होऊनसुद्धा तिने आपण भुताला कसे घाबरवले हे मुळीच सांगितले नाही. तेवढे सोडून बाकीचे सगळे मात्र तिने सांगितले.

मग दुसऱ्या दिवशी चित्राच्या बाबांनी ऑफिसमधून रजा घेतली. बरोबर सुतार, गवंडी, हमाल अशी बरीच मंडळी घेतली आणि ते त्या झपाटलेल्या घरात गेले. त्यांच्याबरोबर चित्रादेखील गेली. पण आईला मात्र त्यांनी बिलकुल पत्ता लागू दिला नाही. ती मुळी त्यांच्या जम्माडी जमतीत नव्हतीच. आली असती तर त्यांना नको होती. अशातला भाग नाही. पण ती फारच भित्री होती. ती स्वत: त्या घरात आलीच नव्हती. पण तिने त्यांनाही तिकडे पाऊल टाकू दिले नसते. मग काय, सगळाच फज्जा!

घराचे कुलूप उघडल्या क्षणीच बाबांनी मोठमोठ्याने-अगदी उंच आवाजात बोलायला सुरुवात

केली. चित्रादेखील तेवढ्याच मोठमोठ्याने ओरडून बोलू लागली. हसू-खिदळू लागली. कामगार मंडळींनी आपली अवजारे आदळायला आपटायला सुरुवात केली. रंगारी मंडळी खराखरा आवाज करून भिंती खरवडू लागली. सुतार रंधा मारायला बसले. खाच्-खच्, खाच्-खुच्! त्यात प्रत्येक जण आपल्या बरोबरच्या माणसाला मोठमोठ्याने ओरडून कामासंबंधी सूचना देऊ लागला. हुकूम सोडू लागला. सबंध घरभर इतका गोंधळ माजला की कुणाचे बोलणे कुणाला ऐकू येईनासे झाले.

या सगळ्या गोंधळात भूत कुठे दडून बसले होते कुणास ठाऊक! पण ते काही कुणाच्या नजरेस पडले नाही. रडले चिडले असेल तर ठाऊक नाही. पण एवढ्या प्रचंड गोंगाटात त्याचा आवाज कुणाला ऐकू येणार?

इतर सगळ्या खोल्यांच्या डागडुजीचा पहिला हात संपत आला, तशी चित्रा आणि तिचे बाबा अडगळींच्या खोलीपाशी आले, तिथेच एका जुन्या पेटीआड तोंड लपवून भूत अंगाची मुटकुळी करून बसले होते. त्याला पाहताच चित्रा जोऽरात ओरडली— 'पकडा! पकडा त्याला!

तिचा आवाज ऐकताच भूत दचकून तीनताड उडाले आणि जमिनीला पाय टेकायच्या आत अधांतरी थरथर कापू लागले. 'हे काय, हे चक्क घाबरतंय तुला!' चित्राचे बाबा म्हणाले. 'आम्ही नाही जा-आम्ही नाही जा!' भूत हवेतच पाय पोटाशी घेऊन बसले. 'भुतांनी माणसांना घाबरवायचं असतं. माणसं कधी भूतांना घाबरतात वाटतं?'

'अरे, पण माझी मुलगी भलतीच धीट आहे.' चित्राचे बाबा म्हणाले, ती मला सुध्दा घाबरवते, तर तुझी काय कथा?'

तू-तू आपलं वचन मोडलंस !' भूत फुरंगटून म्हणाले.

'मुळीच नाही. मी त्याना तुला घाबरविण्याबद्दल काहीसुध्दा सांगितले नाही. ... आता त्यांनी ते प्रत्यक्ष पाहीलंथ, त्याला मी काय करणार' चित्रा जोरात म्हणाली.

'आणि हा तुमचा गोंगाट... ' भूत क्षीण आवाजात म्हणाले, 'हा असाच चालू रहाणार का दिवसभर? सकाळपासून माझ्या डोळ्याला डोळा नाहीय्ये.'

'त्याला काय करणार?' चित्रा मुत्सद्दीपणे म्हणाली, आम्हाला इथं राहायचं तर ही कामं करायला हवीत आणि कामं करायची म्हणजे आवाज होणारच!'

'तर मग मला इथं कसं रहाता येईल?' भुताचा आवाज क्षीण झाला आणि ते अधिकच पारदर्शक दिसू लागले. त्याला धड डोळे सुध्दा पेटवता येईनात.

चार-सहा दिवस सतत काम करून चित्राच्या बाबांनी घर अगदी झकपक करून घेतले आणि मगच एके दिवशी चित्राच्या आईच्या कानावर ही गोष्ट घातली. चित्राच्या आईला भूताची भीती वाटत होतीच. पण बाबानी शपथेवर सांगितले की गेल्या दोन-तीन दिवसांत ते कुणालाही दिसलेले नाही. घरातला गोंगाट असह्य होऊन ते बापडे एक दिवस कुणालाही कळू न देता घरातून चालते झाले होते.

पुन्हा पुन्हा समजूत घातल्यावर चित्राची आई त्या घरात राहायला एकदाची तयार झाली. तात्पुरते थोडे सामान घेऊन सगळी मंडळी संध्याकाळी त्या घरात हजर झाली. घरात आता भुताचा त्रास मुळीच नाही, हे चित्राच्या आईला पटले. घराच्या डागडुजीचे काम अजून थोडे थोडे चालूच होते... त्यामुळे दिवसभर माणसांची वर्दळ चालूच असे. या घरात राहाण्याची चित्राच्या आईला आता मुळीच भीती वाटेनाशी झाली. चित्राला आणि तिच्या बाबांना तर काय, हे घर पहिल्यापासूनच आवडलेले होते! त्यातून आता तर तिचा रुबाब भलताच वाढला होता!

दिवसभर सुतार, रंगारी यांच्या गडबडीमुळे चित्राच्या आईला जरासुध्दा शांतता लाभत नसे एवढे मात्र खरे. रात्रीच काय ते सगळे शांत होई. तेव्हा सगळ्याना शांत झोप मिळायची!

पण एकदा मात्र मध्यरात्री सगळ्याना अचानक जाग आली. केवढातरी ठणठणाट चालला होता.

चित्राची आई भेदरून जागच्या जागी डोक्यावरून पांघरूण घेऊन 'राम राम' म्हणू लागली.

चित्रा मात्र आवाजाच्या दिशेने पळत सुटली. आवाज स्वैपाकघरातून येत होता. चित्राच्या पाठोपाठ तिचे बाबा गेले. पाहतात तो काय—

एक चांगले अगडबंब भूत एका हातात एक ताट धरून दुसऱ्या हाताने लाटणे बडवीत बसले होते.

'तू-तू कोण?' चित्राने विचारले.

'इथल्या भुतानं जागेची अदलाबदल केलीय् माझ्याबरोबर. मी राहत होतो तिथं कसला आवाज नसायचा की हालचाल नसायची. असा कंटाळलो होतो. मग कळलं की इथं बराच गोंगट असतो म्हणून जागा बदलली. आपल्याला गोंगाटच आवडतो. दिवसा प्रश्नच नाही. पण रात्री मात्र शांत असतं. हरकत नाही! मी असा आवाज करून गोंगाट करत जाईन! काय, चालेल ना?'

आणि ते पुन्हा त्या रात्रीच्या शांत प्रहरी ठाण्ठाण् करून थाळी बडवीत बसले.

☆ ☆ ☆

# मेले तरी वाचतील !

ही तुझी खोली आहे. तू वापरायचीस. आणि तुझी तू स्वच्छ ठेवायचीस. सुध्याच्या मावस मावशींनी तिला आपल्या ठाशीव आवाजानं बजावलं. आणि त्या तरातरा खाली निघून गेल्या.

इथं काही गोष्टी सांगायला पाहिजेत. नाहीतर त्या वाचणाऱ्याचा किंवा ऐकणाऱ्याचा घोळ होतो . . .

कारण कोणीही झालं तरी असंच विचारणार ना, की ही सुधा कोण, जिला एक ठाशीवपणे बोलणारी मावस मावशी आहे. ?

—तर ही सुधा मुळची आषाढगावची. आता आली होती श्रावणपूरला. आषाढगावात पुढच्या कॉलेजची सोय नव्हती. अगदी बारावीच्या परीक्षेला सुद्धा सुधाला जावं लागलं होतं जिल्हयाच्या ज्येष्ठगावी. पण सुधाच्या मनात पुढं शिकून मोठ्ठी प्रोफेसरीण बाई व्हायचं होतं. मग त्यासाठी डोळ्यांवर चष्मा लावायला लागला तरी तिची तयारी होती! मराठी खास विषय घेऊन तिला मराठी साहित्याचा अभ्यास करायचा होता!

मग तिच्या आईला आठवलं, की श्रावणपुरात कॉलेज आहे आणि तिथंच आपली एक मावसबहीण दिलेली आहे. तिथं तिचं चांगलं प्रशस्त माडीवालं घर आहे, आणि त्याच्यात ती आणि तिचा नवरा, अशी दोघंच राहतात. तेव्हा सुधाला त्यांच्याकडे पाठवावं, म्हंजे ती बिनघोर कॉलेजचा अभ्यास करील आणि चष्मावाली प्रोफेसरीणबाई होईल!

आता असा विचार करताना सुधाच्या आईनं हे लक्षात घ्यायला हवं होतं, की आपली मावसबहीण स्वभावानं मोठीशी प्रेमळ नाही. त्यातून ती रंगानं साधारण जळक्या पातेल्याच्या तळाइतकी काळी असल्यामुळे व आपण स्वत: कणकेसारखी गोरी असल्यामुळे ती लहानपणापासून आपला दुस्वास करते! पण सुधाच्या आईच्या काही ते लक्षात आलं नाही, कारण ती स्वभावानं अगदी साधी! सुधा आईसारखीच साधी, (लहानपणी तर आई तिला साधी सुधी असंच म्हणायची) आणि आईसारखीच (म्हंजे कणकेसारखी) गोरी आणि वर वडिलांसारखी देखणी.

त्यामुळं सुधाच्या आईचं पत्र आणि त्यापाठोपाठ बॅग घेऊन गोरी देखणी सुधा हजर झाल्याबरोबर सुधाच्या मावस मावशीच्या अंगाचा तीळपापड झाला. (आता त्यांच्या शरीराचा विचार करता त्याची

एक मोठ्ठी तीळाची गोण फार तर होऊ शकली असती—पापड कसला? तो फारच नाजूक! पण एक आपली बोलायची पद्धत झालं) तरीसुद्धा मावस मावशीनी सुधाला परत पाठवून दिलं नाही. कारण सुधाच्या आईचं पत्र आलं, तेव्हाचे सुधाचे मावस मावसे सुधाच्या मावस मावशींना म्हणाले होते की, येतेय् तर येऊंदे बापडी. आपल्या घरात कोणी मूलबाळ नाही. त्यातनं वरती माडीवर तिची सोय केली, की तुला तिचं तोंडसुद्धा बघायला नको. मग तर झालं?

तर मावस मावशांबरोबर ठरल्याप्रमाणे मावस मावशींनी सुधाला आल्या आल्या माडीवरची खोली दाखवली आणि म्हटलं—काय म्हटलं, ते सुरुवातीलाच सांगितलंय्!

मावस मावशी तरातरा निघून गेल्यावर सुधा खोलीकडे पाहात दोन मिनिटं स्वस्थ बसून राहिली. खोली छोटीशीच होती. तिला एक खिडकी होती. त्या खिडकीतून मावशीच्या वाडीतली उंच उंच नारळीची झाडं, हिरवीगार झाडी आणि त्या पलिकडे एकामागे एक पसरलेली पोपटी हिरवी शेतं दिसत होती. खोलीला लागून एक छोटीशी मोरी होती आणि तिच्यावर पाण्याचं मडकं न् एक फुटका चिनी मातीचा कप होता. झालंच तर खोलीत एक लंगडं टेबल आणि मोडकी खुर्चीसुद्धा होती.

मावस मावशींच्या गड्यानं एक अंथरूण, पांघरुणासकटची गादीही लगोलग आणून टाकली.

सुधाच्या स्वभावात एक चांगला गुण होता. तिला काहीही पटकन आवडायचं. कशाबद्दल तक्रार करावी, असं तिला कधी वाटतच नसे. त्याप्रमाणेच आत्ताही झालं. दोन मिनिटं खोलीचं निरीक्षण केल्याबरोबर तिला ती खोली मनापासून आवडायला लागली. कोपऱ्यातली केरसुणी घेऊन तिनं पहिल्यांदा ती लख्ख झाडली. मोडक्या खुर्चीवर सांभाळून चढून तिनं कडीपाटावरची आणि उंच कोपऱ्यातली कोळीष्टकं काढून टाकली. शेवाळलेली मोरी घासून साफ केली. टेबलाच्या तिथंच पडलेल्या एका पायाला एका विटकरीच्या तुकड्याचा टेकू लावला. खुर्ची भिंतीच्या आधारानं उभी केली, वळकटी कोपऱ्यात डोळ्यात न येईलशी ठेवली. एवढंच नाही तर वाडीतून कण्हेरीची चार फुलं आणून ती आपल्या सामानातल्या प्लॅस्टिकच्या ग्लासमध्ये उभी करून टेबलावर ठेवली आणि मग खोलीला म्हटलं. —बघ, आता तू किती छान दिसतेस!

यावर खोली काय म्हणाली, ते एकू आलं नाही. पण काहीतरी चांगलंच म्हणाली असणार! कारण आपण कुणाला चांगलं दिसतेस, असं म्हटलं तर कुणी काही अगदी भांडायला येत नाही!

☆ ☆ ☆

एका परीने मावशीनं असं वेगळं राहचला लावलं, हे सुधाच्या पथ्यावरच पडलं. कारण मावशीच्या अरबट चरबट गोष्टी आणि कुजकट शेरे ऐकण्यापेक्षा इथं एकटंच बसून अभ्यास करावा, खिडकीत उभं राहून हिरवळ डोळ्यात भरून घ्यावी आणि खूपखूप पुस्तकं वाचावीत हे कितीतरी चांगलं होतं! हां—आता कॉलेजमधून आल्यावर संध्याकाळी अगदीच एकटं एकटं वाटतंय? कुरी तरी सोबतीला हवं असं वाटायचं.

पण नाही आत्ता कुणी तर नाही! नंतर पुस्तकांची सोबत मिळाली, तर तोही प्रश्न सुटेल!

अशा विचारानं सुधानं गावातल्या पंचाहत्तर वर्षांच्या जुन्या अखिल भारतीय श्रावणपूर ग्रंथालयात नाव घातलं. ग्रंथालय चांगलंच मोठ्ठं होतं. त्याची एकमजली इमारत होती आणि तळ न् वरचा असे दोन्ही मजले पुस्तकांच्या कपाटांनी गच्च भरून गेले होते. मात्र पुस्तकांची व्यवस्था म्हणावी तेवढी नीट नव्हती. एक म्हातारेसे, एका डोळ्यात मोतीबिंदू झालेले ग्रंथपाल आणि एक चुकार तरुण आणि एक आळशी बाई एवढे तिघेच जण त्या अखिल भारतीय ग्रंथालयाची व्यवस्था पाहात. म्हंजे अव्यवस्था माजवत. पण अधिक चांगली माणसं ठेवायला संचालकांना काही परवडत नव्हतं.

मात्र त्या ग्रंथालयाच्या नशिबानं हल्लीच एक चांगली गोष्ट घडून आली होती. संचालक गावातल्या जहागिरदारांकडे देणगी मागायला गेले असताना जहागिरदारांचा तरुण मुलगा गदाधर त्यांना म्हणाला होता, देणगी मग देऊ — आधी व्यवस्था का ठेयलीये ते तर बघू.

गदाधर शेतकी विषयातला तज्ज्ञ असला, तरी त्याला पुस्तकांची फार आवड होती. ग्रंथालयाची अव्यवस्था पाहून तो पहिल्यांदा इतका चिडला, इतका चिडला की संचालक देणगीचं नाव काढायला धजावेनात. नंतर गदाधरचा राग गेला आणि त्याची जागा दयेनं घेतली का डोळ्यात मोतीबिंदू झालेल्या ग्रंथपालांच्यानं दोन काममचुकारांच्या मदतीनं सगळी व्यवस्था कशी काय राखली जाणार, असा विचार करून त्यानं संचालकांना बजावलं—एका अटीवर देणगी मिळेल. मी सांगेन तशी व्यवस्था ठेवायची. रोज संध्याकाळी माझी शेतीवाडीची कामं संपली की मी येऊन बसत जाईन ग्रंथालयात.

संचालकांना काय, आंधळ्याच्या दोन्ही डोळ्यांचं देवानं फुकट ऑपरेशन करून दिल्यासारखं झालं. देणगीपरी देणगी मिळाली, वर कामाला माणूस!

तर अशा या अ. भा. श्रावणपूर ग्रंथालयातून सुधानं रोज पुस्तकं घरी नेण्याचा निश्चय केला.

☆ ☆ ☆

पहिल्या दिवशी ग्रंथालयातल्या आळशी बाईनं एक हाताला येईल ती टुक्कार कादंबरी दिली. सुधा ती घरी घेऊन आली. उत्साहानं वाचायला बसली. पण कादंबरी टुक्कार! तेव्हा ती कशीबशी तिनं टेबलावर टाकली आणि वर्गात सांगितलेला निबंध लिहायला घेतला. काळोख पडतोय असं लक्षात आल्यामुळं तिनं दिवा लावला आणि वळकटी सोडून ती बिछान्यावरच लिहायला बसली.

एकाएकी थंडी वाजायला लागली, म्हणून ती उठली आणि तिनं खिडकी बंद करून घेतली. आता ती परत बिछान्यावर बसणार, इतक्यात — टेबलावर पडलेल्या कादंबरीचं कव्हर आपोआप उघडलं.

खोलीतला पंखा चालू नव्हता. खिडकी तर आत्ताच बंद केली होती. मग पुस्तकाचं जाड कव्हर उघडण्याइतकं वारं कुठलं?

ती असा विचार करतेय तोच त्याचं पहिलं पान उलटलं, दुसरं, तिसरंही उलटं . . .

एवढ्यात खुर्ची टेबलजवळ किंचित सरकली आणि मोडक्या पायावर कलून उभी राहिली.

पुस्तकाची पानं भराभर उलटत होती. पण ती वाऱ्यानं फडफडावीत, तशी नाही. एकेक पान कुणीतरी उलटावं तशी.

कोण उलटतंय् पानं ? कोण बसलंय् खुर्चीवर ?

सुधा गारठल्यासारखी झाली. तिला किंकाळी फोडावीशी वाटत होती. पण आवाज केला तर जे जे कोण अदृश्य तिथं बसलंय् त्याचं आपल्याकडे लक्ष जाईल या भीतीनं ओरडली तर नाहीच, उलट तशीच सरकत कोपऱ्यात गेली . . . दडून बसावं, तशी बसून राहिली . . .

एवढ्यात, पुस्तकाचं शेवटचं पानही उलटून संपलं. ठप्कन् आवाज करून पुस्तक बंद झालं !

सुधा एक नि:श्वास सोडतेय् एवढ्यात ते पुस्तक टेबलवरून उंच उचललं गेलं आणि जमिनीवर फाड्दिशी फेकलं गेलं.

आता मात्र सुधाच्या तोंडून आ-करून एक अस्पष्ट किंकाळी बाहेर पडली. या पुस्तकाच्या पाठोपाठ आणखी काय काय फेकलं जातं या भीतीनं. भानामाती म्हणून एक भुताटकीचा प्रकार असतो, त्यात सगळ्या घरभर सामान उधळलं जातं असं ती ऐकून होती !

पण नाही. पुस्तकानंतर इतर काहीच हललं नाही. नाही म्हणायला, खुर्ची थोडी मागं सरकली आणि भिंतीला टेकून उभी राहिली.

सुधा हलकेच पुढं झाली आणि तिनं जमिनीवर पडलेलं पुस्तक उचललं.

आणि काय चमत्कार ? कोणी तरी ते तिच्या हातून खेचून घेतलं आणि पुन्हा जमिनीवर भिरकावून दिलं —

त्या पाठोपाठ घोगऱ्या आवाजातले रागीट, वयस्कर शब्द आले — भिक्कार ! भिक्कार आहे अगदी ! हातात धरू नये इतकं भिक्कार !

अरे बाप रे ! हे कोण बोललं आत्ता ? सुधा स्वत:शीच म्हणाली. कारण खोलीत तर तिच्याशिवाय दुसरं कुणीच दिसत नव्हतं !

कशाला घेऊन येतेस असली भयंकर पुस्तकं ? उगाच वेळेचा अपव्यय ! — तोच चिडकट आवाज म्हणाला. कादंबरी लिहिलीय म्हणे ! एक चांगला प्रसंग नाही की एक चांगलं पात्र नाही ! आणि भाषा तर दिव्यच आहे !

सुधाची भीती थोडी कमी झाली. एकूण ते जे कोण बोलत होतं. त्याचा राग तिच्यावर नसून कादंबरीवर होता !

कोण बोलतंय ते मला कळेल का ? — तिनं धीर करून विचारलं.

मी — ! प्राध्यापक नृसिंहनाथ जोगदंड !

नमस्कार. सुधानं नकळत हात जोडले.

आहेत — थोडे फार मॅनर्स आहेत तुला! नाहीतर लोक आजकाल भुतांना फार वाईट वागवतात! हिडीसफिडिस करतात! समोरून आले तरी आरपार पाहात निघून जातात! जशी काही भुतं म्हंजे कोणी नाहीतच! तुम्ही — तुम्ही कुठून आलात?

चाळीसगावाहून. तिथले लोक फार शिष्ट! हं अवघ्या एका गावाला चाळीसगाव म्हणवतात, म्हंजे किती शिष्ट असतील, ते बघ! तिथं मी प्राध्यापक होतो. तशी मला मरून झाली आता दहा एक वर्षं! पण वरच्या कैलासातल्या ऑफिसात भलता गोंधळ! कोणाला कुठं पाठवायचं हे ठरवण्यात वर्षंची वर्षं जातात! तोपर्यंत सगळे आपले नुसते कैलासवासी — घ्या, वाढतेय गर्दी! त्यातून अलिकडे तर तिथं वशिलेबाजी जाम वाढलीये! आमच्या नंतर मेलेले लोक कोणी मुंबईला, कोणी पुण्याला आणि आम्ही? आम्ही या श्रावणपुरात! नाही जात म्हटलं तर म्हणे एकदम बिहारला पाठवतो! नाहीतर आंध्रमध्ये! म्हटलं नको, श्रावणपूर तर श्रावणपूर! निदान मराठी मुलुखात आहे! म्हंजे निदान मराठी वाचन तरी तुटायला नको!

सॉरी हं — ही कादंबरी मला देखील आवडली नव्हती! तुम्हाला तर वाचायला फारच त्रास झाला असेल!

चालायचंच! अग आजकालचे लेखक जिवंत वाचकांचा विचार करीत नाहीत. तिथं मृतांचं काय? इथं स्वतः च्याच विनोदावर खूष होऊन केलेले हः हः हः असं एक मजेशीर हास्य एकू आलं. कलकलाटापेक्षा थोड बरं असं. आणि हो — मी सुद्धा तुला सॉरी म्हणायला हवं. जोगदंडांचा आवाज. तू घाबरली असशील ना सुरुवातीला? पण माझा नाइलाज झाला. मला पाठवलं, हाच पत्ता देऊन घर झपाटायला! आता तूच सांग — खाली ती दोघं जण आहेत! त्यांना लेखनवाचनाचा काही गंध आहे का? म्हटलं तुझ्याकडे पुस्तकंबिस्तकं मिळतील! तुलाही माझी सोबत होईल! अगदीच एकटं एकटं वाटणार नाही! आणि हो — माझी काही अडचण येणार नाही बरं तुला! अधूनमधून असा भेटीन — नाहीतर कळणार सुद्धा नाही, मी आहे, का गेलो ते!

छे छे — राहा ना तुम्ही इथंच! पुस्तकांचं बघते मी कसं काय जमतं ते! आणि हो, आता माझा आवाज लक्षात राहील ना तुझ्या? — जोगदंडांचा आवाज.

हंऽ पण नुसत्या आवाजावर जाऊ नकोस हो! हल्ली आमच्यातही बनवाबनवी वाढल्येय चिक्कार! कोणीही कोणाचाही आवाज काढून फसवतं. म्हणून म्हणतो, मी दिसतो कसा हे एकदा पाहून ठेव. शंका आली तर कधीही रूप बघायला मागत जा.

टेबलाजवळ हळूहळू एक पुसटसं काहीतरी आकार घेऊ लागलं होतं.

मला अजून नीटसं जमत नाही आकार घ्यायला — त्रास पडतो. जोगदंड म्हणाले.

सुधा दोन्ही हात तोंडावर गच्च दाबून उभी. आता काहीतरी अक्राळविक्राळ पाहावं लागणार!

मघाच्या संतापाला घोगऱ्या रागीट आवाजाला शोभेलसं या कल्पनेनं, किंकाळी दाबण्याच्या पवित्र्यात.

पण फुस्! तिच्यासमोर एक ठेंगणासा, मिचिमिच्या डोळ्यांवर चष्मा लावलेला, टकलावरचे राहिलेले थोडेफार केसही पिकले आहेत असा, काटकुळा म्हातारा उभा राहिला होता. तोही पुसट . . .

ती पाहात असतानाच तो अधिकाधिक पुसत होत नाहीसा झाला . . .

☆ ☆ ☆

दुसऱ्या दिवशी सुधानं कादंबरी परत नेऊन दिली. चांगली नव्हती हो फारशी! उगाच दिलीत मला. ती आळशी बाईला म्हणाली. देत चला. आम्हाला कशाला द्यायला सांगता? आळशी बाई खरमरीतपणे म्हणाली. आळशी माणसे खरमरीत बोलण्यात मुळीच मागे नसतात.

तेव्हा सुधानं नावावरून ऐतिहासिक कादंबरी असेल, अशा अंदाजानं अखेरचं बंड घेतलं आणि ती घरी आली.

दिवेलागणी झाल्याबरोबर तोच घोगरा आवाज खोलीत आला. काय गऽ, आज कसलं पुस्तक आणलंस?

आवाजावरून, हात कुठं असतील याचा पत्ता लागण्यासारखा नसल्यामुळं सुधानं पुस्तक टेबलवरच टाकलं . . . तुम्हाला आवडेल, ऐतिहासिक आहे वाटतं! ती म्हणाली.

लगेच कव्हर उघडलं गेलं आणि . . .

हत्तिच्या, ही कसली ऐतिहासिक? हः हः हः हः! अग, ही फडक्यांची कादंबरी आहे! आमच्या तरुणपणात आम्हाला भयंकर आवडायच्या फडक्यांच्या कादंबऱ्या! पण म्हातारपणात आवडायला जरा कठीणच त्या! मग मेल्यावर तर काय —

☆ ☆ ☆

तिसऱ्या दिवशी तिनं कादंबरीच्या कॅटलॉगकडे फिरकायचं नाही, असं ठरवलं. ती सरळ ऐतिहासिक कॅटलॉग घेऊन बसली आणि त्यातनं शोधून पानिपतची बखर घेऊन गेली.

पण तीही जोगदंडांनी जिवंतपणीच वाचली होती . . .

एक गोष्ट सुधाच्या लक्षात आली होती. कथा, कादंबऱ्या, नाटक असली चिल्लर पुस्तकं जोगदंडांना कधीच आवडायची नाहीत. त्यामुळं ती आजकाल ललित साहित्य सोडून, इतर कपाटांमधलं जे काही जाडंजुडं पुस्तक मिळेल ते सरळ उचलून घ्यायची. कधी खगोलशास्त्र, कधी व्याकरण, कधी उत्तर ध्रुवावरचे राजकीय पक्ष, तर कधी गणिताच्या सामाजिक उलाढालींवरील परिणाम . . . पण यातली सुद्धा बरीच पुस्तकं जोगदंडांनी वाचलेलीच निघायची. तेव्हा त्यांच्यासाठी दररोज नवीन पुस्तक घ्यावं तरी कुठलं, हेच सुधाला कळत नसे . . .

त्यातून त्यांना प्रत्येक पुस्तक वाचायला वेळ अतिशय थोडा लागायचा. भुताचं वाचन ते! त्यामुळं भूत जसं एका झपाटच्यात हेऽ या टोकापासून त्या टोकापर्यंत पोचायचे. पान उलटायला काय लागेल तेवढाच वेळ! म्हणजे प्रत्येकी एक सेकंद म्हटला, तरी सहाशे पानाचं पुस्तक दहा मिनिटात सहज वाचून व्हायचं!

कहर म्हंजे पुस्तक वाचून झाल्यावर जोगदंड त्यावर प्राध्यापकी पद्धतीनं बोलत राहायचे . . . म्हंजे सुधाला त्यांची सोबत व्हायची, अनेक विषयांची माहिती व्हायची — हे सगळं खरं! पण ती आधीच कॉलेजातली लेक्चरं ऐकून कंटाळलेली असायची. त्यातूनही लेक्चर ऐकत बसल, तर कॉलेजचा अभ्यास कधी करायचा? शिवाय, तिला मावशी लोकांच्या सांस्कृतिक चालीरीती किंवा भूमितीचा समाजशास्त्रीय विचार असल्या गोष्टी समजून घेण्याची फारशी गरजही नसायची. पण जोगदंड सगळ्या पुस्तकांची तपशीलवार माहिती द्यायचे. वर शिफारस करायचे.

फार सुरेख लिहिलंय हं हे दक्षिण हॉलंडमधल्या मासे खारवण्याच्या कारखान्यांवरचं पुस्तक! वाचूनच टाक! फक्त पाचशे सत्तावन्न पानांचं आहे!

काका — सुधा आता प्राध्यापक जोगदंडांना काका म्हणू लागली होती. काका, मला तुमच्यासारखं सेकंदाला एक पान या गतीनं नाही वाचता येत! मला पंधरा दिवस लागतील ते पुस्तक वाचायला! मग मी अभ्यास कधी करू?

यावर काका हः हः हः हः करून हसायचे. सुधानं आपल्या वाचनाच्या वेगाचं कौतुक केलेलं त्यांना आवडायचं. हसून झाल्यावर ते म्हणाले —

हां, आता भूत झालोय म्हणून फास्ट वाचतो असं नको समजूस. जिवंतपणी सुद्धा मी चांगलच भरभर वाचायचो हां! पाचशे सत्तावन्न पानांचं पुस्तक मी तीन तासांत वाचून संपवायचो?

संपवाल तर काय झालं? सुधा मनातल्या मनात म्हणायची. तुम्हाला भस्म्या रोगच झालाय वाचनाचा! भस्म्या रोगात जसं कितीही खाल्लं तरी माणसाची भूक म्हणून भागत नाही! तसंच कितीही वाचलं तरी तुमचं समाधान म्हणून होत नाही! पण इकडं मी काय करायचं? आज तुमच्यासाठी कुठलं पुस्तक आणायचं, या काळजीनं माझं हल्ली अभ्यासाकडे मन लागेनासे झालंय. आणि तुम्ही? रोज दिवेलागणीबरोबर आज कुठलं पुस्तक आणलं? करून झडप घालता! कुठून ग्रंथालयात नाव घातलं, असं झालंय्!

☆ ☆ ☆

इकडे ग्रंथालयात मात्र तिच्या नावानं बरीच गडबड सुरू झाली होती. त्याचं काय झालं, की गदाधरनं ग्रंथालयाची व्यवस्था सुधारण्यासाठी बऱ्याच नवीन पद्धती सुरू केल्या होत्या, आळशी बाई आणि चुकार तरुण यांना त्यानं वेठीला धरलं होतं. प्रत्येक सभासद साधारणपणे आठवड्याला किती पुस्तक नेतो, हे ठरवून त्यांची त्याप्रमाणे वर्गवारी करण्याचं काम त्यांनी चुकारला सांगितलं होतं. चुकारनं काम सुरू

केल्याकेल्याच त्याच्या लक्षात आलं की ही सुधा नावाची नवीन सभासद दिवसाला एक पुस्तक नेते.

आता दिवसाला एक पुस्तक नेणं हा काही गुन्हा नव्हता. पण असल्या सभासदांमुळेच तर चुकार आणि आळशी यांचं काम वाढत होतं . . .

त्यामुळे चुकारनं गदाधरला सुधाविषयी सांगून टाकलं आणि तिचं खातंच त्याच्यासमोर आणून टाकलं . . .

गदाधरनं पाहिलं — बाप रे, बाप रे! खगोलशास्त्र, व्याकरणशास्त्र, उत्तर ध्रुवावरचे राजकीय पक्ष असली पुस्तकं रोजच्या रोज वाचणारी, ही आहे तरी कोण विदूषी ?

आज ती आली की आत पाठव! गदाधरनं चुकारला सांगून ठेवलं.

चुकारला आनंद झाला! आज हिची चांगली खरडपट्टी निघणार! त्यानं आळशी बाईकडे टाळी मागितली, तिनं अर्थातच ती देण्याचा आळस केला.

पण संध्याकाळी सुधा आल्याबरोबर मात्र आळशी बाईनं तिला उत्साहानं सांगितलं — साहेबांनी आत बोलावलंय. तक्रार आहे तुमच्या वाचनाबद्दल! चुकार हर्षभरानं म्हणाला.

सुधा आत गेली — नाव सांगितलं. कशाला बोलावलं, म्हणून विचारलं. गदाधर चाट होऊन पाहतच राहिला. ही कसली विदुषी ? ही तर अगदीच तरुण दिसतेय. पण मग ती सगळी गहन विषयांवरची पुस्तकं . . .

त्यानं विचारलं, एवढ्या सगळ्या विषयांवरची पुस्तकं तुम्ही नेता! कॉलेजात तुमचा विषय तरी कुठला आहे ?

मराठी साहित्य. त्या विषयावरचं एखादं पुस्तक किंवा एखादी कादंबरी अधूनमधून मला न्यावीशी वाटते हो! पण काय करणार ? काकांसाठी ही सगळी पुस्तकं मला न्यावी लागतात!

मी हवं तर तुम्हांला दर वेळा दोन पुस्तकं न्यायची सवलत —

नको! सुधा घाबरून म्हणाली — ती दोन्ही काकाच वाचतील!

एवढ्या सगळ्या विषयांवर ते वाचतात ? भलतेच विद्वान दिसताहेत तुमचे काका!

हो ना! प्राध्यापक होते! प्राध्यापक नृसिंहनाथ जोगदंड!

हे नाव आपण कुठंतरी ऐकलंय, असं गदाधरला वाटलं. पण कुठं ते आठवेना. तो म्हणाला — ग्रंथालयाच्या नियमाप्रमाणे सभासद फक्त स्वत:साठीच पुस्तक नेऊ शकतो. तुमचे काक स्वत:च का नाही सभासद होत ?

नाही नाही — ते नाही जमायचं! सुधा म्हणाली.

मी विचारतो त्यांना. तुम्ही त्यांना एकदा घेऊन तर या — तेही शक्य नाही. माफ करा. मला तुम्ही अधिक काही विचारू नका. येऊ मी ? — असं म्हणून सुधा घाईघाईनं कॅबिनमधून बाहेर पडली. चुकारनं आळशीकडे — आळशीनं चुकारकडे — एक कटाक्ष टाकला! सुधा आत कुठलं पुस्तक

घ्यावं अशा विचारात पडली आणि याच वेळी एक कॅटलॉग आणि एक पेन्सिल तिच्या रोखानं चालत आली.

हे — हेच पुस्तक हवं होतं मला कधीपासून! तोच घोगरा आवाज. तुम्ही कशाला आलात इथं? सुधाच्याही सहनशक्तीला मर्यादा असते. म्हटलं, तुला थोडी मदत करावी! नेहमी नेहमी तुलाच माझ्यासाठी पुस्तकं शोधावी लागतात! घेतला नंबर लिहून! तुम्ही आधी कॅटलॉग जागेवर ठेवा. कॅटलॉग जागेवर गेला. सुधा शांतपणे नंबर घेऊन आळशी बाईकडे गेली. पण हे काय?

— आळशी बाई चक्कर येऊन काऊंटरखाली पडलेली!

चुकार तिला शुद्धीवर आणण्याच्या प्रयत्नात. त्यानं तिच्या तोंडावर पाणी मारलं, चप्पल हुंगवली, तशी तिनं फक्त डोळे थोडेसे किलकिले केले.

कॅटलॉग... हवेतून... पेन्सिल... उडत असं काहीतरी बोलून तिनं परत धाडकन अंग टाकलं.

बाहेर एकच हलकल्लोळ! गडबड ऐकून गदाधर केबिनच्या बाहेर आला.

काय झालं? या अशा पडल्यात का?

त्यांना चक्कर आली — चुकार म्हणाला. मघा इथला एक कॅटलॉग हवेतून उडत गेला आणि पेन्सिल त्याच्या मागोमाग गेली — ते पाहून चक्कर आली म्हणाल्या. ते सगळं उडत असताना मी नीटसं पाहिलं नाही. पण पाहिलं असतं, तर मलाही आली असती चक्कर! मी त्यांना घरी सोडू का? म्हंजे तसाच परस्पर मीही घरी जाईन —

चला लौकर — सुधा काकांना म्हणाली — इथं केवढा गोंधळ झाला, पाहिलात तुमच्यामुळे?

इथून निघावसच वाटत नाही ग! काय सुंदर ग्रंथालय आहे! इकडेच वाचत बसावसं वाटतंय!

☆ ☆ ☆

घरी परत येताना खालच्या घरातून जोरजोराने कण्हण्याचा आवाज आला, म्हणून सुधानं चौकशी केली, तर मावस मावशी ना थोडासा ताप आलेला आणि त्यांचं डोकं किंचितसं दुखत असलेलं. तशी ती मावस मावशींकडे बघायला आणि त्यांचे काम करायला खालीच थांबली.

अर्थात आज घेतलेलं आणि काकांना 'कध्धीपासून हवंच असलेलं' पुस्तक आपसूक माडीवर गेलं...

आणि ते पुन:पुन्हा वाचण्यात काकांची तंद्री लागली.

सुधा मावस मावशीच्या डोक्याला अमृतांजन लावीत असताना मावस मावशींनी तिला (तापामुळं किंचित कमी ठाशीव झालेल्या आवाजात) विचारलं — काय ग, तुझ्याकडे म्हातारेसे गृहस्थ कोण येतात?

कुठं कोण? कुणीच नाही. सुधाला आता मात्र काकांचा राग यायला लागला होता! त्यांच्या

पायी तिला किती जणांकडे खोटं बोलावं लागत होतं !

नाही कसं ? कधी कधी मी माडीच्या दारात उभी असते, तेव्हा मला स्वच्छ ऐकू येतो आवाज ! म्हाताऱ्या माणसाचा ! व्याख्यान दिल्यासारखा !

कुठंतरी रेडिओ चालू असेल त्या वेळी ! नाही तर मला कोण व्याख्यान देणार ? सुधानं हसण्यावारी नेलं.

याच वेळी गदाधर ग्रंथालय बंद करून सुधाचा पत्ता शोधीत निघाला होता. सुधाच्या काकांचं त्याला कोडच पडलं होतं. पण ते बहुधा आजारी असावेत आणि म्हणून त्यांना ग्रंथालयात येणं शक्य नसावं, असा त्याचा हिशेब. तेव्हा आपणच जाऊन त्यांना पाहून यावं, आणि त्यांच्या अडचणी समजून घेऊन शक्य तर मदत करावी अशा विचारानं तो सुधाकडे यायला निघाला.

अंगणातच त्याला बाहेरून येत असलेले सुधाचे मावस मावसे भेटले. सुधा कुठं राहते ? म्हटल्यावर त्यांनी माडीकडे हात केला... त्यांना काय माहीत की ती आज आपल्या प्रेमळ पत्नीच्या शुश्रुषेसाठी खाली येऊन बसलेय आणि या क्षणी तिचं भव्य कपाळ चेपतेय ?

गदाधर सरळ माडी चढून गेला —

समोरच टेबलाशी एका हलतडुलत राहिलेल्या खुर्चीवर ठेंगणासा, टक्कल पडलेला म्हातारा बसून मिचमिच्या डोळ्यांवरच्या चष्म्यातून एक पुस्तक वाचत होता.

मधून मधून मिटक्या मारीत, वा, वा करीत !

(हुषार मुलांच्या हे लक्षात आलंच असेल, की गदाधरला येताना खिडकीतून पाहून काकांनी आपलं रूप धारण केलेलं होतं. अजिबात अदृश्य होणं हा त्याहून सोपा मार्ग होता — पण त्यासाठी पुस्तक हातातनं सोडावं लागलं असतं ना ? आणि ते करायची तर काकांची अजिबात इच्छा नव्हती !)

नमस्कार प्राध्यापक जोगदंड ! — गदाधरनं म्हटलं.

नमस्कार ! काका चष्म्याच्यावरून त्याच्याकडे पाहात म्हणाले.

एकूण सुधा खोटं बोलत नव्हती तर ! तिचे काकाच पुस्तकं वाचत होते — आणि ते खुद्द प्रोफेसर जोगदंडसुद्धा होते. पण तरीही कुठंतरी घोटाळा आहे खास ! गददाधरच्या मनात आलं.

— आणि एकदम त्याला आठवलं, जोगदंडांचं नाव आपण कुठं ऐकलं ते ! चाळीसगावला आपण शिकत होतो, तेव्हा तिथले प्रख्यात प्राध्यापक नृसिंहनाथ जोगदंड वारले, म्हणून आपल्याला एक दिवसाची रजा मिळाली होती !

बाप रे ! — म्हंजे हे —

पण गदाधर भुताला घाबरणाऱ्यांपैकी नव्हता. त्यानं सरळ काकांना विचारलं — मला वाटतं, तुम्ही दहा वर्षांपूर्वीच वारलात, नाही का ?

हो ! एवढंच म्हणून काका अदृश्य झाले !

☆ ☆ ☆

काल जरी सुधानं सगळं हसण्यावारी नेलं असलं तरी आज मात्र तिला अगदी मुद्देमालासकट पकडायचं, असं ठरवून मावस मावशी दुसऱ्या दिवशी दिवेलागणीनंतर दरवाजात उभ्या राहिल्या. अगदी हातात काठी घेऊन !

आज मी लायब्ररीत गेलेच नाही ! — हा सुधाचा आवाज ! कोणी येत नाही म्हणते, तर सटवी बोलतेय कोणाबरोबर ? खोटारडी मेली !

बरं केलंस ! कालचंच पुस्तक आज परत वाचीत म्हणतो !

— एक म्हातारा, घोगरा आवाज ! फार मजा आहे त्यात ! पेंग्विन पक्षी आपले सण साजरे कसे करतात, ते त्यात मोठ्या अभ्यासपूर्ण —

मावसमावशींची आता खात्रीच झाली. त्या काठी घेऊन तरातरा माडीवर गेल्या !

वर पाहातात, तर कोणीच नाही.

एकटी सुधा बसलीये. समोर अभ्यासाची वह्या, पुस्तकं घेऊन !

तरी त्यांचं समाधान झालं नाही ! खात्री करून घेण्यासाठी त्यांनी विचारलं — आत्ता कोण बोलत होतं ?

कोण बोलणार ? तुम्हीच बघा — आहे कोणी इथं ? काल म्हटलं ना तुम्हांला — रेडिओ लागतात या वेळी !

नाईलाजानं मावसामावशी परत निघाल्या आणि तेवढ्यात —

अगदी अडलंच होतं जसं काही काकांचं ! मावस मावशींची कटकट होते, म्हणून टेबलावरचं पुस्तक उचलून ते दुसरीकडे निघाले होते — ! थोडा वेळ नसतं वाचलं तर . . .

टेबलवरचं पुस्तक उठून कुणाच्या तरी काखोटीत अडकल्यासारखं चालायला लागल्याबरोबर मावस मावशी किंचाळत खाली धावल्या . . . मावस मावशांना हाका मारीत !

अहो, पळा ! आधी मांत्रिकाकडे जा — माडीवर भूत आहे ! माडीवर भूत आहे !

☆ ☆ ☆

दहा मिनिटं होऊन गेली. तरी काका काहीच बोललेले नाहीत.

इथंच आहात ना तुम्ही ? मग बोला की काहीतरी !

काय बोलणार ? मला वाचनापुढं कशाचं भान राहिलं नाही. माझं चुकलं. ह: ह: ह: ह: — करून काका हसले. मला वाटतं, आता मी निघावे हे बरं. तो दीडदमडीचा मांत्रिक येऊन या प्रख्यात

प्राध्यापक जोगदंडाचे धिंडवडे काढील, त्याच्या आत!

कुठं जाणार तुम्ही ?

गावातच कुठंतरी जायला हवं. नाहीतर वरती कळवायला लागणार! मग पुन्हा ते थांबून राहाणं . . . नाहीतर वशिले लावणं . . .

सुधाच्या डोळ्यात पाणी आलं. पुस्तकं आणून देण्याचा त्रास असला तरी काकांनी हे घर सोडून जाण्याची कल्पना तिला सहन होत नव्हती . . .

दुसरं काही नाही ग! वेड्यासारखा फिरेन मी पुस्तकं वाचायला मिळाली नाहीत तर! वाचणं म्हणजे माझं असणं आहे!

सुधाच्या मनात आलं — किती थोडी जिवंत माणसं पुस्तकांवर इतकं प्रेम करीत असतील ?

जातो मी. मांत्रिक आता कुठल्याही क्षणी येईल! काका निघाले. तू चांगला अभ्यास कर. खूप वाच. मोठी प्राध्यापिका हो!

भूत असल्यामुळे काकांना जड पावलांनी जिना उतरणं शक्य नव्हतं . . . पण ते दुःखानं उतरू लागले, एवढं खरं . . .

अर्ध्या जिन्यावरच त्यांना गदाधरनं गाठलं.

तुम्ही — इकडे कसे ? सुधानं आश्चर्यानं विचारलं. न्यायला आलो काकांना.

कुठं ?

काकांच्यासाठी एकच जागा योग्य आहे. आपलं ग्रंथालय!

ग्रंथालय ? — काकांनी एकदम उत्साहानं पुसटसं मूळ रूप धारण केलं. हिला म्हणत होतो मी परवा! कायम राहावसं वाटतं तिथं, म्हणून!

हं — पण वाचायला यायचं ते फक्त ग्रंथालय बंद झाल्यावर हं! नाहीतर लोक घाबरतील. नंतर रात्रभर हवी तेवढी पुस्तकं वाचा!

बेटा — तुझे उपकार मी कसे फेडू ?

सांगतो. रोज हे आमच्याकडचे ते चुकार, आळशी लोक पुस्तकांचे गठ्ठे वाट्टेल तसे टाकतात, वेळच्या वेळी पुस्तकं जागेवर न लावता! किंवा लावलीच तर चुकीच्या ठिकाणी पुस्तकं लावतात. तुम्ही फक्त एवढंच करायचं. रोज बाहेर पडलेली पुस्तकं जागेवर ठेवायची! — कराल एवढं.

विचारतोस काय ? असे हे माझं आवडीचं काम आहे! मग आता जाऊ मी ग्रंथालयात ?

— एक सुसाट वाऱ्याचा झोत गेला — सुईईईऽऽ

☆ ☆ ☆

सुटले! आता तरी मी शांतपणे अभ्यास — असं म्हणता म्हणता सुधा खुळ्यासारखी रडू लागली.

अग त्यात काय ? ते काही आपल्यातून कायमचे गेले नाहीत! त्यांना भेटायचं असेल तर कधीही

ग्रंथालयात भेटता येईल! ग्रंथालयाच्या वेळेनंतर! — गदाधरनं तिचं समाधान केलं.

एवढ्यात सुधाच्या मावस मावशी मांत्रिकाला घेऊन आल्या. ठाशीवपणे म्हणाल्या — आणि हीच ती मुलगी! हिनं माझ्या जागेत भूतं आणली — हिला एक क्षणभर राहू देणार नाही मी इथं!

अग पण ती जाईल कुठं? मावस मावशांनी रदबदली केली.

बिचारी सुधा! ती एकदा त्यांच्या, एकदा मावशीच्या तोंडाकडे पाहात राहिली होती. तिच्या मनात येत होतं खरंच, कुठं जायचं मी आता.

तू माझ्याबरोबर चल. गदाधर म्हणाला — आमचा मोठ्ठा बंगला आहे! त्यातल्या दोन खोल्या तुला घे. भरपूर वाच — अभ्यास कर! चल — बॅग भर!

त्या दिवसापासून अखिल भारतीय श्रावणपूर ग्रंथालयाची व्यवस्था एकदम सुधारली. पुस्तकं जागच्या जागेवर — कॅटलॉग्ज व्यवस्थित भरलेले! सगळे म्हणायला लागले, की गदाधरनं म्हटल्याप्रमाणे ग्रंथालयाला शिस्त लावून दाखवली!

पण मध्यरात्रीनंतर ग्रंथालयाच्या झडपातून आत डोकावून पाहणारे काही वेगळंच म्हणत असतात.

—म्हणतात, की गठ्ठ्यांमधली पुस्तकं अशी आपोआप उठून पटापट आपापल्या जागी जाऊन बसतात!

☆ ☆ ☆

# टापटीप आजी

प्राध्यापक थट्टेवारी, नावाच्या मानाने बरेच गंभीर होते. मुख्य म्हणजे ते कधीही, कुठलीही गोष्ट थट्टेवारी नेत नसत.

तसे त्यांचे वय फार नव्हते. अजून लग्नदेखील व्हायचे होते. पण कपाळावरचे आठ्यांचे जाळे आणि डोळ्यांवरचा भिंतीसारख्या जाड काचांचा चष्मा, यामुळे तिशीचे थट्टेवारी पन्नाशीचे दिसत. माणूस नेहमी गंभीर राहिला की तो लौकर म्हातारा होतो, तो असा!

पण बापडे थट्टेवारी गंभीर न राहतील तर काय? त्यांचा कॉलेजात शिकविण्याचा विषयच मुळी एकजात गंभीर तत्त्वज्ञान! विषय गंभीर, प्राध्यापक गंभीर, विद्यार्थी गंभीर! कुणाला कंटाळा आला तर त्याने तोंडावर हात घेऊन जांभई देखील गंभीरपणे द्यायची. सगळा वर्गच इतका गंभीर असायचा की, कडीपाटात घरटे करून राहिलेल्या चिमण्यासुद्धा चिवचिवायला घाबरायच्या आणि वर्गाच्या भिंतीत बिळे करून राहिलेले उंदीरसुद्धा इकडून तिकडे पळताना मध्येच गंभीर होऊन सावकाश डुलक्या देत देत चालायचे.

तर अशा या प्राध्यापक थट्टेवारींनी एकदा ठरवले की, आपण एक महागंभीर प्रबंध लिहायचा. त्याचा विषय 'विश्वाच्या उत्पत्तीपासून चराचर व्यापून राहिलेल्या अगणित योनींमधे पिशाच्चयोनीची गणना. . . .' वगैरे वगैरे असा साधारण दहा ओळी लागतील इतका लांब, पण थोडक्यात सांगायचे तर 'जगात भुते नाहीत' असा होता. भुते का व कशी नाहीत याचे संशोधन करून प्राध्यापक थट्टेवारी हा जाडजूड प्रबंध लिहिणार होते आणि त्यामुळे त्यांचा नावलौकिक खूपच वाढणार होता. नावलौकिक वाढला की थट्टेवारी अधिकच गंभीर होणार होते. त्यांच्या कपाळावरच्या आठ्यांची संख्या कितीतरी वाढणार होती. चष्म्याचा नंबर अधिकच वाढणार होता. झालेच तर ते दाढीदेखील वाढविणार होते.

या गंभीर विषयावर लिखाण करायचे तर ते शहरातल्या गजबजलेल्या ठिकाणी राहून कसे होणार? थट्टेवारींना गडबड मुळातच आवडत नसे. गडबडीत लिखाण करायचे म्हणजे डोक्यात नुसता गोंधळ. रेडिओवरची गाणी, टीव्हीवरचे सिनेमे, बिल्डिंगमधली भांडणे, रस्त्यावरच्या मारामाऱ्या, गल्लीमधलं क्रिकेट. . . एक ना दोन. या गदारोळात लिहायचे म्हणजे माणूस चुकून तत्त्वज्ञानाच्या प्रबंधात गाण्याची एखादी ओळ किंवा क्रिकेट स्कोअर, नाहीत रस्त्यावरच्या शिव्या लिहून जायचा. म्हणजे आली का पंचाईत! तेव्हा प्राध्यापकांनी ठरवून टाकले की, एखाद्या खेडेगावी, अगदी शांत रानातल्या ठिकाणी तात्पुरते

एखादे घर घ्यायचे आणि तिथे राहून लिहायचे. प्रबंध पुरा झाला की मगच शहरात यायचे. मग नावलौकिक वगैरे पुढचे सगळे!

बेत ठरताच थट्टेवारींनी चांगली तीन महिन्यांची रजा घेतली. विद्यार्थ्यांनाही थोडं हायसं वाटले, कारण आता तीन महिने ते हसायला मोकळे झाले होते. रजा मिळताच थट्टेवारींनी शहर सोडले, आणि आपली कपड्यांची लहानशी पिशवी, आणि पुस्तकांची प्रचंड ट्रंक घेऊन ते खर्बुजगड या गावी हजर झाले.

खर्बुजगडचे नाव कुणी कधीच ऐकलेले नाही. कारण गाव भलतेच आडबाजूला, अगदी एकलकोंडे आहे. गावात घरे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी. सगळीकडे मोठमोठे पहाड, आणि घनदाट झाडी. बोलायला माणूस मिळण्याची पंचाईत, तर गडबड करायला कोण येणार? रेडिओ, टीव्ही सोडाच. साधे विजेचे दिवेसुद्धा नाहीत, इतका मागासलेला गाव. त्यामुळे सगळीकडे शांतताच शांतता. कसली म्हणून हालचाल नाही. थोडक्यात गाव अगदी प्राध्यापकांच्या लिखाणाला हवा तसा! मनातल्या मनात खूष होऊन प्राध्यापकांनी कपाळाला आठ्यादेखील घातल्या. या अशा गावात घर मिळणे मात्र कठीण. जी काही थोडी-फार कुटुंबे होती, ती झोपड्यांमधून राहायची. नाही म्हणायला चार-दोन चांगली, पक्क्या बांधकामाची घरे होती. पण ती मोकळी नव्हती. हो-नाही करता करता एक घर त्यांना सापडले. पण ते होते पार गावाबाहेर, शिवाय . . . शिवाय ते मोकळे असण्याचे एकच कारण होते. लोक म्हणत की, ते भुताटकीचे घर आहे.

आता लोक काहीही म्हणोत—पण प्राध्यपकांचा भुताटकीवर विश्वासच्च नव्हता. म्हणजे त्यांच्या प्रबंधाचा विषय जिथे 'भुते नाहीत' असा होता, तिथे त्यांना स्वतःला भुतांचे काय? तेव्हा त्यांनी ताबडतोब तिथे एक घर घेऊन टाकले. घरही तसे छोटेखानी आणि सुबक होते. झपाटलेली घरे असतात तसे फुटके तुटके काळेकुट्ट नव्हते. चांगले स्वच्छ आणि नीटनेटके हाते. प्राध्यापक तिथे राहायला लागले, ट्रंक उघडून पुस्तके ऐसपैस मांडून वाचनात वेळ घालवू लागले, आणि त्यांच्या एकदम ध्यानात आले. की घरात वरकामासाठी कुणी माणूस हवे. 'धुणी-भांडी, घर स्वच्छ ठेवणे, ही सगळी कामे करणे प्राध्यकांना शक्यच नव्हते. ते जर ती कामे करत बसले असते, तर प्रबंध लिहिण्यासाठी वेगळा माणूस ठेवावा लागला असता. म्हणून वरकामासाठी कुणी मिळते का, याची चौकशी करायला प्राध्यापकांनी सुरुवात केली. गावात माणसे कमी, पण अगदीच नव्हती असे नाही. पण हे घर भुताटकीचे, म्हणून कुणी इथे काम करायलाच येईना. प्राध्यापकांनी लोकांना पुष्कळ समजाविले की, या जगात भुते नाहीत. आपला प्रबंधच्या प्रबंध त्यांनी घडाघड म्हणून दाखविला. पण ते खेडूत लोक, त्यांना थोडेच थट्टेवारीचे शहरी तत्त्वज्ञान समजणार? त्यांनी ते सगळेच चेष्टेवारी नेले.

आणि एके दिवशी एक म्हातारी आजी, कुणाच्या तरी सांगण्यावरून कामावर हजर झाली.

आजी गोरीपिट्ट होती. केसांची चांदी झालेली, कमरेत वाकलेली, पण तुरुतुरु चालणारी, बोलायला

चांगली, पण तिची एक गोष्ट मात्र प्राध्यापकांना अजिबात नाही आवडली! एकसारखे हसण्याची तिची सवय. कारण असो नसो, म्हातारी आपली खिक्-खिक् करून हसायची, बोलता बोलता हसायची. कधी कधी न बोलताही, बोलण्याऐवजी हसायची. थट्टेवारी तर कधीच हसत नसत. त्यामुळे आजीचे हसणे त्यांना फारच विचित्र वाटले. पण करणार काय? माणूसच मिळत नव्हते, तेथे हसणारे का होईना, पण घरकामाला माणूस मिळाले.

'काय ग, तुझा आहे का भुतांवर विश्वास,' प्राध्यापकांनी विचारले. आजी नुसती हसली.

'हे घर झपाटलेले आहे म्हणतात. लोक येत नाहीत इथे. नाही येत ते बरंच आहे म्हणा. तेवढीच शांतता! पण मग तू कशी आलीस? शहाणी दिसतेस, इतर गावकऱ्यांसारखी विश्वास नाही ठेवत भुतांवर.'

आजी पुन्हा खिक्-खिक् हसली.

'—आणि नाहीस ठेवत तेच बरोबर,' प्राध्यापकांचे व्याख्यान सुरू झाले. 'अग या जगात—'

यानंतर पंधरा मिनिटे एकटे प्राध्यापकच बोलत होते. आणि आजी नुसतीच हसत होती. हसून झाल्यावर ती म्हणाली, मग राहू ना मी आजपासून कामावर, पाहा तर कसं आरशासारखं ठेवते घर. नाही पटलं तर मला काढून टाका.' आणि ती आपला पदर खोचून सरळ कामाला लागली.

☆ ☆ ☆

प्राध्यापक वाचत बसले होते, सगळीकडे अगदी किर्रर शांतता पसरली होती.

आणि एकदम धडाधड भांडी कोसळून पडल्याचा आवाज झाला. 'ठणा ठण्-ठण् ठण् ठण्—'

प्राध्यापकांनी कानांत बोटं घातली, इतका कर्कश आवाज! माणसाने गंभीरपणे वाचायचे कसे?

आणि एवढ्यावर आवाज थांबले नाहीत. ठण्-ठण्-खण्-खण्! खर्र खर्र भांडी एकमेकांवर आपटत राहिली. जमिनीला घासत राहिली.

क्षणभर प्राध्यापकांच्या मनाला एक विचार चाटून गेला— या घरात लोक म्हणतात ती भुताटकी तर नसेल? दुसऱ्याच क्षणी त्यांना स्वतःच्या विचारांची लाज वाटली. 'जगात भुतं नसतात म्हणून किती वेळा सांगायचं?' त्यांनी मनाला बजाविले.

आणि त्यांचेच खरे होते. आत जाऊन पाहातात, तो भुते नाहीत, आणि काही नाही. आजीबाई भांड्यांचा पसारा मांडून बसल्या आहेत. 'खर्रर खर्रर' घासताहेत.

प्राध्यापकांना पाहून आजी नुसती हसली.

'भलत्या वेळी काय भांडी घेऊन बसलीस?' ते गुरकावले, 'मला त्रास होतोय् आवाजाचा.' आणि एकाएकी एक गोष्ट ध्यानात येऊन ते ओरडले. आणि ही भांडी कुठून आणली एवढी? 'इथंच होती.' आणि आजी हसली. 'घासून ठेवते. मला नाही भांडी अस्वच्छ आवडत.'

'पण ही काय वेळ झाली भांडी घासायची? एवढ्या गलबल्यात मी वाचू कसा?'

'काम पसंत नसेल तर मला काढून टाका.' एवढे म्हणून आजी हसली.

प्राध्यापकांच्या पोटात भीतीचा गोळा उठला. काढून काय टाका? माणूस शोधता शोधता नाकी नऊ आले. आता एक मिळाले आहे. तर आल्यापासून काढून टाकण्याची गोष्ट! ते काही नाही; काही झाले तरी आजीला सांभाळून ठेवलेच पाहिजे. काम सोडून जाऊ देता कामा नये.

'छे छे—तू राहा इथंच!' असे म्हणून ते पाय आपटत बाहेर आले. वाचनाचा सत्यानाश झालाच होता. म्हणून त्यांनी कंदील मालविला, आणि बिछान्यावर अंग टाकले! भांड्यांच्या आवाजात झोपणे कठीणच होते. पण तरीही त्यांनी झोपण्याचा कसोशीने प्रयत्न चालविला. एकेक भांडे उडी मारून घडवंचीवर बसते आहे, असे मिटल्या डोळ्यांसमोर आणून त्यांनी भांडी मोजायला सुरुवात केली . . . एक, दोन, तीन . . . एकशे तेवीस . . . पाचशे सदुसष्ट . . .सातशे अठ्ठावन्न . . .

☆ ☆ ☆

—सकाळी प्राध्यापक जागे झाले तेच मुळी एका विचित्र जाणिवेने. त्यांना आपण एकसारखे हलत आहोत, डोलत आहोत, असा भास होत होता. मग त्यांच्या लक्षात आले की, आपल्याला काही झालेले नाही; फक्त ज्या पलंगावर आपण झोपलो आहोत. तोच हेलकावे खात आहे. या कल्पनेसरशी खाडकन् उठून बसले, आणि आजूबाजूला पाहू लागले, तो काय—खोलीत चारी बाजूंना पाणीच पाणी झाले होते. आणि त्या पाण्यावर त्यांचा पलंग एखाद्या नावेसारखा अलगद तरंगत होता. बरे; पाणीदेखील साधेसुधे नव्हते. साबणाचे होते. त्या पाण्यातून साबणाचे सप्तरंगी बुडबुडे उठून मजेने हवेत फिरत होते. त्यांपैकी काही बुडबुड्यांनी तर प्राध्यापकांभोवती फेर धरला.

'काय प्रकार आहे हा? आजी.' ते ओरडून गुडघ्यावर बसले. तसा पलंग आणखीनच खाली जाऊ लागला.

'आजी-आजी—'

'ओरडू नका. ही मी इथेच आहे—'. साबणाच्या पाण्यातून एक मुंडके वर आले. चेहऱ्यावर नेहमीचेच हसू.

'याचा अर्थ काय?'

'काही नाही. मी जागा साफ धुवून काढतेय्.' आजी हसत हसत म्हणाली, आणि पुन्हा डोके पाण्यात दिसेनासे झाले.

'अशी धुऊन काढतात जागा?'

'मी अशीच काढते.' पुन्हा मुंडके वर आले. 'मला नाही नुसतं टिपून घेतलेलं आवडत. मला फार स्वच्छता लागते. काम पसंत नसेल तर—'

पुन्हा काम सोडण्याची धमकी!' प्राध्यापकांनी घाईघाईने विषय बदलला. 'पण एवढा साबण कुठून

आणलात ?'

'इथंच होता.' नाकावरचा साबणाचा फुगा टिचकीने उडवत आजी म्हणाली. त्या पाठोपाठ हसणे.

ते हसणे ऐकून प्राध्यापकांच्या अंगाचा तिळपापड झाला. पण रागाने पाय आपटायची देखील सोय नव्हती. पलंग पाण्यात गेला असता. साबणाचे फुगे फोडत ते एका जागी निमूट बसून राहिले.

☆ ☆ ☆

दुपारी प्राध्यापक थोडे-फार भानावर आले. अजूनपर्यंत एक पान वाचून झाले नव्हते की एक ओळ लिहून झाली नव्हती. समाधान एवढेच होते की, जिथे माणूस राहू शकणार नाही, असे गावकरी म्हणत, त्या घरात अजूनपर्यंत राहून त्यांनी भूतबीत काही नाही, असे सिद्ध केले होते. पण एवढ्याने काय भागणार ? आज मात्र लिहायला सुरुवात करायलाच हवी होती.

कागद जुळवून, पेन उघडून प्राध्यापक बसले मात्र, एका मजेशीर गोष्टीकडे त्यांचे लक्ष वेधले.

त्यांच्या समोरच्या भिंतीशी एक काळसर ढग तरंगत होता.

क्षणभर त्यांना वाटले दृष्टिदोष असेल. त्यांनी चष्मा काढला, तो पुसला, आणि परत डोळ्यांवर चढवला.

ढग आता अधिकच मोठा आणि धुरकट झाला होता.

म्हणे म्हणेस्तवर आणखी एक ढग खोलीतून आत आला. त्याच्या पाठोपाठ दुसरा . . . मग तिसरा . . . पाहता पाहता खोली धुळीच्या ढगांनी भरून गेली.

चालले आहे तरी काय हे पाहण्यासाठी प्राध्यापक उठून दाराशी गेले. एवढ्यात एक धुळीचा ढग जणू त्यांच्यावरच येऊन आपटला. प्राध्यापकांच्या नाका-तोंडात धूळ जाऊन ते खोकू लागले.

धूळ येत आहे तरी कुठून हे पाहण्यासाठी त्यांना फार लांब जावेच लागले नाही. शेजारची खोली धुळीने गच्च भरून गेली होती, आणि तिथूनच इतर खोल्यांत धूळ पसरत होती.

ही एवढी धूळ झाली तरी कशाने हे पाहण्यासाठी त्यांनी डोळे खूप ताणले. पण धुळीनं काहीच दिसत नव्हते. त्यांनी बोलण्यासाठी तोंड उघडले, पण खोकल्याची जबरदस्त उबळ आल्यामुळे ते काहीच बोलू शकले नाहीत.

'दूर व्हा—दूर व्हा—धूळ जाईल तोंडात' धुळीत दिसणारी आजीची पुसट आकृती त्यांना सांगत होती. हातात खराटा घेऊन ती भिंती आणि कडीपाट झाडत होती. इतर गोष्टींप्रमाणे खराटाही इथलाच असणार यात शंका नव्हती. हळूहळू पसरत पसरत धूळ सगळ्या घरभर गेली, आणि प्राध्यापकांना आता कुठे पळावे ते कळेना. घराच्या कुठल्या भागात आपण आहोत हेही समजत नव्हते. अशी धुळीची वावटळ घोंगावत होती. शेवटी त्यांनी कसाबसा आपला बिछाना गाठला, आणि डोक्यावर पांघरूण घेऊन ते झोपून राहिले.

आजीला काही विचारण्याची सोय नव्हती. पडल्यापडल्या ते दोघांमध्ये काल्पनिक संवाद काय झाला असता, याचा विचार करू लागले,

खोक्- खोक् -' स्वच्छ करतेय् घर. '—पण एवढी धूळ? मला नाही एवढ्याशा झाडूनं वरवरचा कचरा काढून घ्यायला आवडतं.'

'मला-खोक् खोक्-मला. असं चालायचं नाही. तू घरभर धूळ केलीस... खोक् खोक्- तर मी लिहायला कुठं बसायचं?

'हे बघा, काम पटत नसलं तर-'

'चुकलो, माझे आई. तू काम सोडू नकोस. राहा इथंच.' (आणि या पाठोपाठ हसण्याच्या फैरीमागून फैरी. प्राध्यापकांच्या अंगाची लाही लाही.)

प्राध्यापकांनी मनाशी विचार केला की, हे प्रकार नव्यानेच कामावर आल्यामुळं आजी करीत असेल. नेहमीनेहमी हे करणे काही तिला शक्य होणार नाही, आणि आपल्याला हवी तशी शांतता मिळेल.

पण त्यांची ही समजूत चुकीची ठरली. दररोज सकाळी जमीन साबणाने घासणे, दुपारी धूळ साफ करणे, आणि रात्री भांडी घासणे-बडवणे तर चालूच राहिले. पण त्याच्या जोडीला दररोज एकेक नवीन गोष्ट येऊन मिळू लागली. दोन-तीन दिवसानंतरचा प्रकार. दिवस वाया जातो. म्हणून पहाटे तीन-साडेतीन वाजताच प्राध्यापक उठून बसले, आणि तोंड धुवून लिहायला सुरुवात करणार इतक्यात ओ ओ ऽ' अशी एक लांबलचक आर्त तान त्यांच्या कानांवर आली. क्षणभर त्यांना आपण रेडियोवरचे हिंदी गाणे ऐकतो आहोत असे वाटले. मग त्यांना वाटले की, आपल्याला झोप लागली असून स्वप्न पडत आहे, पण स्वप्नातही ते कधी हिंदी सिनेमा पाहत नसत. त्यामुळे ते जागे होते खास!

त्यांच्या एवढा विचार होईतो गाण्याच्या ओळीदेखील सुरू झाल्या, 'कही दीप जले कही दिल... जरा देख ले आकर परवाने... तेरी कौनसी है मंझिल!' प्राध्यापक आश्चर्याने ऐकतच राहिले— खर्बुजगडसारख्या, आडगावातल्या या आडघरात हिंदी चित्रपटांतली गाणी कोण म्हणते आहे ते त्यांना कळेना. एवढ्यात दुसरे गाणे सुरू झाले. ('आयेगा... आनेवाला... आयेगा... आयेगा...')

प्राध्यापकांनी लिहीत असलेले कागद गुंडाळून ठेवले. घरात म्हणेज 'विविध भारतीचा 'कोहिनूर गीत गुंजारव'च सुरू झाला होता. चित्रपटामध्ये हातात मेणबत्त्या घेऊन, काळे किंवा पांढरे कपडे घालून, केस मोकळे सोडून, गाणी म्हणणारे सगळे भटकते प्रेतात्मे आज त्यांच्या घरात वस्तीला आलेले दिसत होते. गाणीदेखील अगदी विनासंकोच 'फुल व्हॉल्युम'चा आवाज लावून म्हटली जात होती.

'साथी रे ऽ... तुमबिंन जिया उदास' संपले आणि प्राध्यापक खोलीतून बाहेर पडले. आता हिंदी सिनेमातल्यासारखी एखादी केस मोकळे सोडलेली तरुणी हातात मेणबत्ती घेऊन फिरताना आपल्याला दिसणार, आणि गावकऱ्यांचे भुताटकीचे भाकित खरे होणार याविषयी त्यांना शंका राहिली नव्हती. त्याप्रमाणे ते जिन्याशी आले, आणि वरून दिवा घेतलेली आकृती येतानाही त्यांना दिसली. केस मोकळे सोडलेली-

पांढरे कपडे घातलेली.'

छे, तसे कोणी नव्हते. आजीबाईच हातात दिवा घेऊन पायऱ्या उतरत होत्या.

'झोपमोड का झाली! मला आपली सवय आहे रात्रीच्या वेळी गाणी ऐकण्याची.' आजी हसून म्हणाली.

प्राध्यापकांनी घाईघाईने माडीवर जाऊन ग्रामोफोन बंद केला. 'जुना ग्रामोफोन आहे.' आजी हसतहसत सांगू लागली. 'इथलाच आहे. पण बंद नको होता करायला. तेवढीच सोबत होते मला म्हातारीला.'

'सोबतीसाठी काय सिनेमातली गाणी लावायची? हं आणि तीही अशी सस्पेन्सची? रहस्यमय सिनेमातली?'

'कुठली मिळतील ती लावते.' असे म्हणून आजी खिक् खिक् हसली, 'ऐकून ऐकून मलाही पाठ झाली आहेत. 'आजा रेऽ परदेशी-मैं तो कबसे खडी-' आजी गाऊ लागली. ते असह्य होऊन. प्राध्यापक धावतच वर गेले आणि त्यांनी ग्रामोफोन. परत लावला.

'पण तू आधी रात्रीच्या वेळी फिरतेस कशाला? झोपत का नाहीस?'

'मी झोपू?' आजी पुन्हा हसली.

'आणि घराची काळजी कोण घेईल? मी सगळीकडे फिरून बघत असते. कुठं काय पडलंय्, काय मोडलंय्. काय घासायला हवं-काय पुसायला हवं-' आणि ती पुन्हा हसू लागली.

'हसू नकोस.' प्राध्यापकांचा संताप अनावर झाला. हे चाललंय् काय? मी इथं शांततेनं लिहायला आलो. एक मिनिटाची शांतता मिळेल तर शपथ! रात्री साडेतीन वाजतासुद्धा ही ऽ बोंबाबोंब! मला हे चालायचं नाही!'

'मग? मी जाऊ उद्यापासून?' आजीनें शांतपणे विचारले.

प्राध्यापकांना एकदम आपली चूक उमजली. कसे बोलून फसला आपण? 'माफ कर. पुन्हा नाही मी संतापणार.' असे काहीतरी बोलून ते परत आले आणि बिछान्यावर पडले. पण काहीतरी विचार करायलाच हवा होता. हे असे किती दिवस चालणार? आल्यापासून आठवडा होत आला, लेखन-वाचन सोडाच, सुखाची झोपसुद्धा त्यांना मिळाली नव्हती. (वर आणकी ते हसणे. त्यांना पाहून सगळी माणसे हसता हसता मध्येच थांबत आणि ही म्हातारी-सरळ तोंडावर हसते. काहीतरी करायला हवे! काहीतरी करायलाच हवे!)

दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर निर्णय घेण्याची पाळी आली.

दुपारची वेळ होती. आज पहिल्याप्रथमच घर शांत होते. आजीने शेवटी आपले ऐकले तर- अशा आनंदात प्राध्यापकांनी पेन उघडले. आणि ते लिहायला सुरुवात करणार इतक्यात. 'वाऊ ऽऽ ऊ ऊ ऊ ऽऽऽ-'

कुत्र्याचे कर्कश, भुंकणे त्यांच्या कानांवर आले. पलीकडच्या कुणाचे कुत्रे असेल म्हणून त्यांनी

दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण नाही. आवाज अगदी जवळून येत होता.

एकाएकी एवढ्यात आणखी तीन-चार कुत्र्यांनी एकदम मधेच भुंकायला सुरुवात केली. पहिला 'वाऊ' करी. दुसरे 'भो भो' मग सगळे एकदम. मग पुन्हा पहिला वाऊ ऽऽ मग दुसरे 'भो भो' असा काही ऑर्केस्ट्राच चालला होता.

त्यात मधेच मांजराचे 'मियाँव मियाँव' सुरू झाले. म्हणजे 'वाऊ-ऽऽ' 'भो भो' 'मियाँव मियाँव' वाऊ ऽऽ' प्राध्यापकांना हा गदारोळ असह्य झाला.

ते उठले, आणि आत जाऊन पाहतात तो—

मधे आजी बसलेली, आणि तिच्या भोवताली चार काळेभोर दांडगट कुत्रे उभे. तिने टाकलेले चपातीचे तुकडे खाताहेत. अंगावर तीन मांजरे खेळताहेत. ती त्यांना दूध भरवत आहे. कुत्री आणि मांजरे सहसा इतकी प्रेमाने एकत्र नांदत नाहीत. पण आजींची हुकमत काही अपूर्व होती.

दारात आलेल्या प्राध्यापकांकडे पाहून आजी मंदपणे हसली.

'आजपासून ही कुत्री नि मांजरं राहणार आहेत इथंच. जागा स्वच्छ ठेवायची तर हवीतच ती. कुत्री-मांजरं असली की, पाली-झुरळं फिरकत नाहीत.' आजी म्हणाली.

प्राध्यापकांच्या जिवाचा संताप संताप झाला. त्यांना काय करावे तेच सुचेना. भिंतीवर डोके आपटावे की बुक्कीने दरवाजा तोडावा? पाय दणादण आपटावेत की केस उपटून घ्यावेत? आवाज-आवाज-आवाज भांड्यांचे सफाईचे-पाण्याचे-कुत्र्यांचे-मांजरांचे-गाण्यांचे-क्षणभरसुद्धा शांती नाही का मिळणार? कुठून आला आवाज इथं? दुसरं कुणी गडीमाणूस मिळणार नाही अशा या घरात?

'तुम्हाला पटत नसेल तर तसं सांगा.' आजी गोड हसून म्हणाली. 'म्हणजे मी काम सोडून...'

आजीचे वाक्य अर्धवटच राहिले. तिच्या अंगावरून पटापट उड्या मारून तिन्ही मांजरे धावतच प्राध्यापकांकडे आली होती. त्यांच्या अंगाखांद्यावर खेळू-बागडू लागली होती. त्यांना झटकून टाकता टाकता प्राध्यापकांची पुरेवाट होत होती. त्यातच कुत्रेदेखील प्रेमळपणे त्यांच्या पाठीमागे लागले.

प्राध्यापकांनी ताबडतोब निर्णय घेतला. पळता पळता ते ओरडले, 'छे छे-तुला कोण कामावरून टाकील? तू राहा. तू राहा इथंच! मीच दुसरं घर शोधतो.'

असे म्हणून प्राध्यापक थट्टेवारींनी धूम ठोकली. ते काळे कुत्रे त्यांना पोचवायला बऱ्याच लांबवर गेले.

'मग? मी राहीनच इथे.' परतलेल्या मांजरांच्या डोक्यावरून हात फिरवत आजी म्हणाली, 'हे माझंच तर घर आहे. मोठा आला होता इथं राहायला! मी अशी कुणाला राहू देईन काय? मी मोठ्या टापटीपीची आहे. माणसांच्या वाऱ्यानं मी बरी घर अस्वच्छ होऊ देईन? म्हणे, जगात भुतं नाहीत! बावळट मेला!'

—आणि इतके बोलून ती कुत्र्या-मांजरांसकट अदृश्य झाली. ☆ ☆ ☆